लोकमत
शनिवार ०३.०६.२०२३
हॅलो सोलापूर
epaper.lokmat.com

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज, ता.माळशिरस, जि. सोलापूर

फोन नं. (०२१८५) २२६४३३

संस्थेच्या अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक, व्यवसाय, द्विलक्षी, वरिष्ठ महाविद्यालये व वसतिगृह इत्यादी शाखांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये खालील शैक्षणिक पात्रतेच्या सहशिक्षक/शिक्षणसेवक/अतिरिक्त शिक्षकांच्या नेमणुका करावयाच्या आहेत.

| विभाग | रिक्त पद | संख्या | | | | शैक्षणिक पात्रता | विषय | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पूर्णवेळ | अर्धवेळ | अंश. | एकूण | | | |
| उच्च माध्यमिक | शिक्षण सेवक/शिक्षक | १ | - | २ | ३ | एमए (द्वितीय) बीएड. | भूगोल | ओपन |
| उच्च माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | १ | - | - | १ | एमए (द्वितीय) बीएड | भूगोल | ओपन |
| उच्च माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | २ | - | - | २ | एमएस्सी (द्वितीय) बीएड | जीवशास्त्र | ओपन |
| उच्च माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | १ | - | - | १ | एमएस्सी (द्वितीय) बीएड | रसायनशास्त्र | ओपन |
| उच्च माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | १ | - | - | १ | एमएस्सी (द्वितीय) बीएड | गणित | ओपन |
| उच्च माध्यमिक | शिक्षण सेवक | १ | - | - | १ | एमकॉम (द्वितीय) बीएड | वाणिज्य संघटन, अर्थशास्त्र | ओपन |
| उच्च माध्यमिक | शिक्षण सेवक | - | १ | - | १ | एमकॉम (द्वितीय) बीएड | पुस्तकपालन व लेखाकर्म | ओपन |
| उच्च माध्यमिक | सहशिक्षक | - | १ | - | १ | एमकॉम (द्वितीय) बीएड | वाणिज्य संघटन | ओपन |
| उच्च माध्यमिक | सहशिक्षक | - | १ | - | १ | एमए (द्वितीय) बीएड | अर्थशास्त्र | ओपन |
| द्विलक्षी उ.मा. | अतिरिक्त शिक्षक | १ | - | - | १ | एमएस्सी (द्वितीय) ॲग्री बीएड | पीकविज्ञान | ओपन |
| द्विलक्षी उ.मा. | अतिरिक्त शिक्षक | १ | - | - | १ | बी.ई.किंवा एमएस्सी किंवा डिप.इन इंड. इले. (द्वितीय) किंवा डिप. इन. इले. अँड रेडिओ इंजि. (द्वितीय) किंवा इले. टेलि. कम्यु. | इलेक्ट्रॉनिक्स | ओपन |
| माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | ७ | - | - | ७ | बीएस्सी., बीएड. | विज्ञान, गणित | ओपन |
| माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | ७ | - | - | ७ | बीएबीएड | मराठी, इतिहास किंवा मराठी, भूगोल | ओपन |
| माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | ७ | - | - | ७ | बीएबीएड | इंग्रजी, इतिहास किंवा इंग्रजी, भूगोल | ओपन |
| वरिष्ठ महाविद्या/ व्यवसाय | अतिरिक्त शिक्षक | १ | - | १ | २ | एमए (द्वितीय) एमपीएड | शारिरिक शिक्षण | ओपन |
| वसतिगृह | अतिरिक्त सहअधिक्षिका | ३ | - | - | ३ | पदवीधर प्रशिक्षित | — | ओपन |

वेतन व सेवानियम महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याच्या नियमानुसार. तरी पात्र व इच्छुक उमेदवारांनी त्यांचे पूर्ण नाव, शैक्षणिक पात्रता, विषय, श्रेणी, जात, जात पडताळणी, अनुभव, सध्याचा व कायमचा पत्ता, फोन/ मोबाईल नंबर इत्यादी तपशिलाचे स्वतःचे हस्ताक्षरातील अर्ज व अर्जासोबत शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव इत्यादी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रतीसह ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसात मा. अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज मु.पो. सदुभाऊ चौक, अकलूज, ता.माळशिरस, जि. सोलापूर पिन-४१३१०१ या पत्त्यावर किंवा समक्ष संस्था कार्यालयाकडे पाठवावेत.

**संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील** (अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज)

लोकमत क्रीडांगण सोलापूर, शनिवार, दि. ३ जून २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज, ता.माळशिरस, जि. सोलापूर

फोन नं. (०२१८५) २२६४३३

संस्थेच्या अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक, व्यवसाय, द्विलक्षी, वरिष्ठ महाविद्यालये व वसतिगृह इत्यादी शाखांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये खालील शैक्षणिक पात्रतेंच्या सहशिक्षक/शिक्षणसेवक/अतिरिक्त शिक्षकांच्या नेमणुका करावयाच्या आहेत.

| विभाग | रिक्त पद | संख्या | | | | शैक्षणिक पात्रता | विषय | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पूर्णवेळ | अर्धवेळ | अंश. | एकूण | | | |
| उच्च माध्यमिक | शिक्षण सेवक/शिक्षक | १ | - | २ | ३ | एमए (द्वितीय) बीएड | भूगोल | ओपन |
| उच्च माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | १ | - | - | १ | एमए (द्वितीय) बीएड | भूगोल | ओपन |
| उच्च माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | २ | - | - | २ | एमएस्सी (द्वितीय) बीएड | जीवशास्त्र | ओपन |
| उच्च माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | १ | - | - | १ | एमएस्सी (द्वितीय) बीएड | रसायनशास्त्र | ओपन |
| उच्च माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | १ | - | - | १ | एमएस्सी (द्वितीय) बीएड | गणित | ओपन |
| उच्च माध्यमिक | शिक्षण सेवक | १ | - | - | १ | एमकॉम (द्वितीय) बीएड | वाणिज्य संघटन, अर्थशास्त्र | ओपन |
| उच्च माध्यमिक | शिक्षण सेवक | - | १ | - | १ | एमकॉम (द्वितीय) बीएड | पुस्तकपालन व लेखाकर्म | ओपन |
| उच्च माध्यमिक | सहशिक्षक | - | १ | - | १ | एमकॉम (द्वितीय) बीएड | वाणिज्य संघटन | ओपन |
| उच्च माध्यमिक | सहशिक्षक | - | १ | - | १ | एमए (द्वितीय) बीएड | अर्थशास्त्र | ओपन |
| द्विलक्षी उ.मा. | अतिरिक्त शिक्षक | १ | - | - | १ | एमएस्सी (द्वितीय) ॲग्री बीएड | पीकविज्ञान | ओपन |
| द्विलक्षी उ.मा. | अतिरिक्त शिक्षक | १ | - | - | १ | बी.ई.किंवा एमएस्सी किंवा डिप.इन इंड. इले. (द्वितीय) किंवा डिप. इन. इले. अँड रेडिओ इंजि. (द्वितीय) किंवा इले. टेलि. कम्यु. | इलेक्ट्रॉनिक्स | ओपन |
| माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | ७ | - | - | ७ | बीएस्सी., बीएड. | विज्ञान, गणित | ओपन |
| माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | ७ | - | - | ७ | बीएबीएड | मराठी, इतिहास किंवा मराठी, भूगोल | ओपन |
| माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | ७ | - | - | ७ | बीएबीएड | इंग्रजी, इतिहास किंवा इंग्रजी, भूगोल | ओपन |
| वरिष्ठ महाविद्या/ व्यवसाय | अतिरिक्त शिक्षक | १ | - | १ | २ | एमए (द्वितीय) एमपीएड | शारिरिक शिक्षण | ओपन |
| वसतिगृह | अतिरिक्त सहअधिक्षिका | ३ | - | - | ३ | पदवीधर प्रशिक्षित | — | ओपन |

वेतन व सेवानियम महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याच्या नियमानुसार. तरी पात्र व इच्छुक उमेदवारांनी त्यांचे पूर्ण नाव, शैक्षणिक पात्रता, विषय, श्रेणी, जात, जात पडताळणी, अनुभव, सध्याचा व कायमचा पत्ता, फोन/ मोबाईल नंबर इत्यादी तपशिलाचे स्वतःचे हस्ताक्षरातील अर्ज व अर्जासोबत शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव इत्यादी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रतीसह ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसात मा. अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज मु.पो. सदुभाऊ चौक, अकलूज, ता.माळशिरस, जि, सोलापूर पिन-४१३१०१ या पत्त्यावर किंवा समक्ष संस्था कार्यालयाकडे पाठवावेत.

**संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील** (अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज)

दैनिक लोकमत
दि: 3/06/2023 वार शनिवार

पुण्य नगरी

पुणे-सोलापूर | रविवार, ४ जून २०२३ वर्ष :२४ | अंक : २०९ | पाने : १२+४+८=२४ | किंमत : ५.००

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज

ता.माळशिरस, जि.सोलापूर. फोन नं. (०२१८५) २२६४३३

संस्थेच्या अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक, व्यवसाय, द्विलक्षी वरिष्ठ महाविद्यालये व वसतिगृह इत्यादी शाखांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये खालील शैक्षणिक पात्रतेच्या सहशिक्षक / शिक्षण सेवक/ अतिरिक्त शिक्षकांच्या नेमणुका करावयाच्या आहेत.

| विभाग | रिक्त पद | संख्या | | | | शैक्षणिक पात्रता | विषय | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पूर्णवेळ | अर्धवेळ | अंश. | एकूण | | | |
| उच्च माध्यमिक | शिक्षण सेवक / शिक्षक | १ | - | २ | ३ | एमए (द्वितीय) बीएड | भूगोल | ओपन |
| उच्च माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | १ | - | - | १ | एमए (द्वितीय) बीएड | भूगोल | ओपन |
| उच्च माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | २ | - | - | २ | एमएस्सी (द्वितीय) बीएड. | जीवशास्त्र | ओपन |
| उच्च माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | १ | - | - | १ | एमएस्सी (द्वितीय) बीएड. | रसायनशास्त्र | ओपन |
| उच्च माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | १ | - | - | १ | एमएस्सी (द्वितीय) बीएड. | गणित | ओपन |
| उच्च माध्यमिक | शिक्षण सेवक | १ | - | - | १ | एमकॉम (द्वितीय) बीएड. | वाणिज्य संघटन, अर्थशास्त्र | ओपन |
| उच्च माध्यमिक | शिक्षण सेवक | - | १ | - | १ | एमकॉम (द्वितीय) बीएड. | पुस्तकपालन व लेखाकर्म | ओपन |
| उच्च माध्यमिक | सहशिक्षक | - | १ | - | १ | एमकॉम (द्वितीय) बीएड. | वाणिज्य संघटन | ओपन |
| उच्च माध्यमिक | सहशिक्षक | - | १ | - | १ | एमए (द्वितीय) बीएड | अर्थशास्त्र | ओपन |
| द्विलक्षी उ.मा. | अतिरिक्त शिक्षक | १ | - | - | १ | एमएस्सी (द्वितीय) ॲग्री बीएड | पीकविज्ञान | ओपन |
| द्विलक्षी उ.मा. | अतिरिक्त शिक्षक | १ | - | - | १ | बी.ई. किंवा एमएस्सी किंवा डिप. इन इंड.इले. (द्वितीय) किंवा डिप.इन.इले. ॲण्ड रेडिओ इंजि.(द्वितीय) किंवा इले.टेलि.कम्यु. | इलेक्ट्रॉनिक्स | ओपन |
| माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | ७ | - | - | ७ | बीएस्सी बीएड | विज्ञान, गणित | ओपन |
| माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | ७ | - | - | ७ | बीएबीएड | मराठी, इतिहास किंवा मराठी, भूगोल | ओपन |
| माध्यमिक | अतिरिक्त शिक्षक | ७ | - | - | ७ | बीएबीएड | इंग्रजी, इतिहास किंवा इंग्रजी, भूगोल | ओपन |
| वरिष्ठ महाविद्यालय/ व्यवसाय | अतिरिक्त शिक्षक | १ | - | १ | २ | एमए (द्वितीय) एमपीएड | शारिरीक शिक्षण | ओपन |
| वसतिगृह | अतिरिक्त सहअधिक्षिका | ३ | - | - | ३ | पदवीधर प्रशिक्षित | - | ओपन |

वेतन व सेवानियम महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याच्या नियमानुसार. तरी पात्र व इच्छुक उमेदवारांनी त्यांचे पूर्ण नांव, शैक्षणिक पात्रता, विषय, श्रेणी, जात, जात पडताळणी, अनुभव, सध्याचा व कायमचा पत्ता, फोन/मोबाईल नंबर इत्यादी तपशिलांचे स्वत:चे हस्ताक्षरातील अर्ज व अर्जासोबत शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव इत्यादी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रतीसह ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसात मा.अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज, मु.पो.सदुभाऊ चौक, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर पिन-४१३१०१ या पत्त्यावर किंवा समक्ष संस्था कार्यालयाकडे पाठवावेत.

संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील
अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज.

जनमत
सर्वसामान्यांचे
संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, लातूर
शुक्रवार ०९ जून २०२३


Shankarrao Mohite Mahavidyalaya Akluj - 413101 Library

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिन व जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा

संग्रामनगर दि.०८ (प्रतिनिधी) – अकलूज येथील महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शिवराज्याभिषेक दिन व जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा.बाळासाहेब साळुंखे होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे होते.

प्रमुख वक्ते बाळासाहेब साळुंखे यांनी मार्गदर्शन करताना जागतिक पर्यावरण दिनाचे महत्त्व पटवून दिले.जागतिक स्तरावर पर्यावरणाचे संरक्षण करणे हे भावी पिढ्यांसाठी अत्यंत आवश्यक आहे असे सांगितले.

शिवराज्यभिषेक दिनानिमित्त महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी शुभम हेडगे यांनी आपल्या मनोगतातून शिवस्वराज्य दिनानिमित्त शिवराज्याभिषेक सोहळ्याचे महत्त्व विषद केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनी अध्यक्षीय मनोगतामध्ये पर्यावरणाचे संतुलन राखणे ही जगाची व मानव जातीची गरज बनलेली आहे. तसेच शिवाजी महाराजांचे पर्यावरण विषयक विचारांची जाणीव जागृती विद्यार्थ्यांमध्ये होणे गरजेचे आहे,असे मत व्यक्त केले.यावेळी डॉ.जनार्दन परकाळे यांनी शिवाजी महाराजांच्या



स्वराज्य संकल्पना विषयी मनोगत व्यक्त केले.पुढे त्यांनी आपल्या मनोगतामध्ये शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्या पर्यंतचा स्वराज्य निर्मितीचा इतिहास मांडला.तसेच याप्रसंगी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डि.जी.मगर यांनी केले,तर आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.सज्ञन पवार यांनी मानले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वयंसेवक हितेश पुंज यांने केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

सुराज्य सोलापूर
शुक्रवार, दि. ९ जून २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# छत्रपती शिवरायांचा ३५० वा राज्याभिषेक सोहळा दिन उत्साहात

✓ सुराज्य/बार्शी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० वा राज्याभिषेक सोहळा दिन बार्शी शहर व तालुक्यात उत्साहात साजरा करण्यात आला. विविध संस्था संघटनाच्या वतीने छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक, जलाभिषेक केला तसेच शिवराज्याभिषेक मध्यवर्ती सोहळा समिती बार्शीच्या वतीने शहरात १७० ठिकाणी ११ आदल्यांची सलामी देत राज्याभिषेक दिन साजरा केला. सुमारे २१०० आदल्यांची शहरात सलामी देण्यात आली. शहरात विविध ठिकाणी मंडळांनी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी शिवभक्तांनी छत्रपती शिवरायांचा जयघोष केला.

## शिवराज्याभिषेक मध्यवर्ती सोहळा समिती बार्शी

बार्शी शहरातील प्रत्येक गल्लीत, प्रत्येक चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेका निमित्ताने शहराच्या विविध चौकात सायंकाळी ७ वाजता मुर्ती स्थापन करुन ८ वाजता प्रत्येक ठिकाणाहून ११ आदल्यांची सलामी देण्यात आली. सदर उत्सव संपुर्ण बार्शी शहर आणि परिसरात तब्बल १७० ठिकाणी साजरा करण्यात आला एकूण २१०० आदल्यांची सलामी देण्यात आली. शिवराज्याभिषेक मध्यवर्ती सोहळा समिती बार्शी चे समन्वयक बापूसाहेब कदम यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम घेण्यात आला



**जय शिवराय प्रतिष्ठान बार्शी :** प्रतिष्ठानने पवित्र नद्यांच्या पाण्याने छत्रपती शिवरायांच्या अर्धाकृती पुतळ्यास जलाभिषेक करण्यात आला. आमदार राजेंद्र राऊत व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पुष्पहार घालून जय शिवराय प्रतिष्ठान कडून छत्रपती शिवरायांना मानवंदना देण्यात आली. यावेळी मिठाई वाटप करून शिवराज्याभिषेक मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी समाजबांधव उपस्थित होते. यावेळी समस्त शिवभक्तांच्या वतीने आमदार राऊत यांना छत्रपती शिवरायांच्या शिवस्मारकाच्या शिवसृष्टीच्या कामाची पूर्तता लवकर व्हावी अशी मागणी करण्यात आली. यावेळी आमदार राऊत यांनी येत्या शिवजन्मोत्सव पर्यंत शिवसृष्टी उभा करण्याच्या सूचना देवू अशी ग्वाही दिली. कामाच्या पूर्तीसाठी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

**शिवराज्य सेना :** येथील शिवराज्य सेनेच्या वतीने छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी शिवराज्य सेनेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, युवराज ढगे, प्रीतम मोरे आदी उपस्थित होते.

## अकलूज येथे शिवराज्याभिषेक दिन साजरा

माळशिरस तालुका मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड जिजाऊ ब्रिगेड अकलूज नगरपालिका यांचे संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५० वा शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला अकलूज येथील जयशंकर उद्यान येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सदर कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. जिजाऊ वंदना सामूहिक रित्या गाऊन जिजाऊ ब्रिगेडच्या प्रांतिक सदस्य प्रिया नागणे यांनी सादर केलेली शिवगर्जना कार्यक्रमास उपस्थित असणाऱ्या शिवभक्तांचे लक्ष वेधून घेत होती.

जय शंकर उद्यान अकलूज येथील कार्यक्रमानंतर मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड जिजाऊ ब्रिगेड व अकलूज नगरपालिकेचे सर्व कर्मचारी यांच्यावतीने अकलूज येथील शिवसृष्टीत असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्याच ठिकाणी इतिहास तज्ञ व लेखक चंद्रशेखर गायकवाड यांचे शिवराज्याभिषेक दिना निमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन चरित्र पर व्याख्यान झाले. सदर व्याख्यानात छत्रपती शिवाजी महाराज त्यांचे राज्याभिषेक सोहळ्याच्या वेळी घडलेल्या घटना क्रमांक ची माहिती चंद्रशेखर गायकवाड यांनी उपस्थितांना दिली.

कार्यक्रमास मराठा सेवा संघाचे पुणे विभागीय अध्यक्ष उत्तमराव माने, विभागीय सचिव वनिता कोरटकर, पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष निनाद पाटील, माळशिरस तालुका मराठा सेवा संघाचे उपाध्यक्ष हंबीरे साहेब, डॉक्टर कोडग, डॉक्टर सनस, माळशिरस तालुका संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष दिगंबर मिसाळ, उपाध्यक्ष सचिन पराडे, प्रहार संघटनेचे अमोलजी जगदाळे, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रांतिक सदस्य अक्काताई माने, प्रिया नागणे, तालुका जिजाऊ ब्रिगेडचे अध्यक्ष मनोरमालावंड शारदा चव्हाण, शुभांगी क्षीरसागर, संभाजी ब्रिगेडचे बबनराव शेंडगे, तसेच अकलूज नगरपालिकेचे कर निरीक्षक प्रशासकीय अधिकारी माननीय श्री नरोटे साहेब, कक्षा अधिकारी काशीद साहेब, बाळासाहेब वाईकर साहेब, अभियंता राहुल फुले, तेजस फुले, अक्षय फुले, नितीन काकडे, स्वप्निल कुलकरणी तसेच अकलूज नगरपालिकेचे विभागातील कर्मचारी, मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड जिजाऊ ब्रिगेड तालुका शाखेचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते सूत्रसंचालन निनाद पाटील यांनी करून आभार संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष दिगंबर मिसाळ यांनी मानले.

## शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज

अकलूज येथील महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शिवराज्याभिषेक दिन व जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा.बाळासाहेब साळुंखे होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे होते. शिवराज्यभिषेक दिनानिमित्त महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी शुभम हेडगे यांनी आपल्या मनोगतातून शिवस्वराज्य दिनानिमित्त शिवराज्याभिषेक सोहळ्याचे महत्त्व विषद केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनी. अध्यक्षीय मनोगतामध्ये पर्यावरणाचे संतुलन राखणे ही जगाची व मानव जातीची गरज बनलेली आहे. तसेच शिवाजी महाराजांचे पर्यावरण विषयक विचारांची जाणीव जागृती विद्यार्थ्यांमध्ये होणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले. यावेळी डॉ. जनार्दन परकाळे यांनी शिवाजी महाराजांच्या स्वराज्य संकल्पनां विषयी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डि. जी.मगर यांनी केले, तर आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.सज्जन पवार यांनी मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वयंसेवक हितेश पुंज यांने केले.

आठवड्याची सुरुवात सकारात्मक विचारांनी
सोलापूर • सोमवार, १० जुलै २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

**नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण** ३ ते १२ पर्यंतचा अभ्यासक्रम तयार, महिन्याखेरीस जाहीर होण्याची शक्यता

# नववी ते बारावीपर्यंत सेमिस्टर सिस्टिम; १५० विषयांचा पर्याय, वर्षात २ परीक्षा

## तयार झाला एनसीएफ-2023, देशातील शालेय शिक्षणात बदल होणार

अनिरुद्ध शर्मा . नवी दिल्ली

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार (एनईपी) तिसऱ्या वर्गापासून बारावीपर्यंतचा राष्ट्रीय आराखडा (एनसीएफ) तयार झाला आहे. त्याच्या प्रकाशनाची तयारी सुरू झाली आहे. एनईपी-२०२० जाहीर होण्याचा तिसरा वर्धापन दिन २९ जुलै किंवा त्याच्या आधी एनसीएफ जाहीर होऊ शकतो. सर्व दहा वर्गासाठी नवीन पुस्तके तयार करण्यासाठी विषय तज्ञांची निश्चित करण्यात आली आहे. एनसीएफ जाहीर होताच पुस्तके तयार करण्यासाठी समित्यांची स्थापना होईल. इयत्ता तिसरी ते बारावी पर्यंतच्या शालेय शिक्षणात आता १५० विषयांची पुस्तके तयार केली जातील. शैक्षणिक सत्र २०२४-२५ च्या सुरुवातीच्या महिन्यांत नवीन एनईपीनुसार इयत्ता ३, ६ वी आणि नववीची पुस्तके येऊ शकतात.

### पाचपट वेगाने काम

- मागील धोरण १९८६ मध्ये आले. पुस्तके २००८ पर्यंत आली. यावेळी २०२० मध्ये धोरण, २ वर्षांत प्री स्कूलची पुस्तके, बारावीपर्यंतचा अभ्यासक्रम पूर्ण झाला.
- धोरण दस्ताऐवज 'सार्थक' मध्ये २९७ टास्क लिस्ट आहे.

### 1. फाउंडेशन स्टेज ( 3 ते ८ वर्षे ): कोणतीही परीक्षा नाही

बाल वाटिका / प्री-स्कूलमध्ये मुलांना जादूई पिटाऱ्यातून (५३ प्रकारचे खेळ-खेळणी, पोस्टर, बोर्ड, बिल्डिंग ब्लॉक, प्लेइंग कार्ड) शिकवले जाईल. स्कूल बॅग नसेल. सर्व केंद्रीय शाळांत बाल वाटिका सुरू झाल्या. जादुई पिटारा फेब्रुवारीत जाहीर झाला. खासगी शाळांतही प्ले ग्रुप व नर्सरीचे वर्ग घेतले जातात. आता एनईपीमध्ये सुरुवातीची तीन वर्षे सरकारी शाळांतही शिकवले जाईल.

- **६ ते ८ वर्षे** : प्री-स्कुलिंग झालेल्या सहा वर्षांच्या मुलास पहिल्या वर्गात प्रवेश मिळेल. त्यात केवळ दोन पुस्तके असतील. भाषा व गणित. दुसऱ्या वर्गानंतर फाउंडेशन लेव्हल पूर्ण होईल. फाउंडेशन लेव्हलमध्ये कोणतीही परीक्षा नसेल. याची पुस्तके उपलब्ध आहेत.
- **जन्मापासून तीन वर्षांपर्यंत** : आई-वडिलांसाठी देखील पहिल्यांदाच अर्ली चाईल्ड केयर एज्युकेशन अभ्यासक्रम (पालन-पोषणाबाबत) तयार झाला आहे.

### 2. प्रीप्रेटरी स्टेज (८ ते ११ वर्षे) : तीन भाषा व गणिताचा अभ्यास

- इयत्ता तिसरीत ८ वर्षांच्या मुलांना प्रवेश मिळेल. तीन भाषा व गणिताचा अभ्यास असेल. पाचव्या वर्गापर्यंतचे शिक्षण मातृभाषा किंवा स्थानिक भाषेतून होईल.
- तिसऱ्या वर्गात पहिल्यांदा विद्यार्थ्यांचे मूल्यांकन होईल. पाचव्या वर्गाच्या अखेरीस दुसऱ्यांदा मूल्यांकन होईल.

### 3. मिडल स्टेज (११ ते १४ वर्षे) : व्होकेशनल एक्सपोजर असेल

सहाव्या वर्गात ११ वर्षांच्या मुलास प्रवेश मिळेल. आठव्या वर्गापर्यंत मुलांना व्होकेशनल एक्सपोजर मिळेल. त्याचे मूल्यांकन होणार नाही. भाषा व विज्ञान व्यतिरिक्त मानव्यशास्त्र, विज्ञान, कला, सामाजिक शास्त्राचा पायाभूत अभ्यास असेल. आठव्या वर्गाच्या अखेरीस तिसरे मूल्यांकन होईल. तिसरा, पाचवा व आठव्या वर्गातील मूल्यांकन बोर्ड परीक्षेसारखी होणार नाही. नियमित समुपदेशन.व्यावसायिक शिक्षणाचे मूल्यांकन नवव्या वर्गापासून होईल.

### 4. सेकंडरी स्टेज (१४ ते १८ वर्षे) : ९वीचा निकाल दहावीशी जोडणार

नववी ते बारावीपर्यंत सेमिस्टर सिस्टिमने शिक्षण होईल. वर्षात बोर्ड परीक्षेसारख्या दोन संधी मिळतील. नववी-दहावी आणि अकरावी-बारावीमध्ये एकूण १६-१६ पेपर द्यावे लागतील. म्हणजे एक वर्षात किमान ८ पेपर असतील. नववीचा निकाल दहावीच्या अंतिम गुणपत्रिकेत जोडलेला असेल. तसेच अकरावीचा निकाल बारावीच्या अंतिम निकालासोबत असेल. त्याचे एकत्रित प्रमाणपत्र असेल.

- ९वी व १०वीत आठ स्ट्रिम असतील. मानव्यशास्त्र-भाषा, गणित, व्यावसायिक शिक्षण, शारीरिक शिक्षण, कला, सामाजिक शास्त्र, विज्ञान, इंटरडिसिप्लिनरी ग्रुप. या ८ समुहात प्रत्येकातून दोन म्हणजे १६ पेपर निवडावे लागतील.
- या आठ गटांतून किमान तीन समूहातील चार विषय निवडावे लागतील. प्रत्येक विषयाचे चार पेपर असतील. त्यासाठी १५० पर्याय असतील.
- आतापर्यंत ११ वी व १२ वी पर्यंत विज्ञान, वाणिज्य, कला शाखा होत्या. परंतु आता शाखांचे विभाजन नसेल. संगीत, क्रीडा, क्राफ्टला कला शिक्षण, शारीरिक शिक्षण तसेच व्यावसायिक शिक्षणाचा दर्जा गणित, विज्ञान, मानव्य, भाषा व सामाजिक विज्ञाना सारखाच असेल. रिपोर्ट कार्डऐवजी हॉलिस्टिक प्रोग्रेस कार्ड असे म्हटले जाईल.

### आतापर्यंतची प्रगती काय ?: प्री-स्कूलचे वर्ग सुरू झाले, शिक्षकांना प्रशिक्षण

केंद्रीय विद्यालयांत बाल वाटिका प्री-स्कूल वर्ग सुरू झाले. केव्हीएस-एनव्हीएसच्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. सीबीएसई शाळांत व गुजरातमध्ये होलिस्टिक प्रोग्रेस कार्डचा पथदर्शी प्रकल्पाची चाचणी देखील झाली. देशातील ६० बोर्डात एकरुपता आणण्यासाठी नॅशनल असेसमेंट सेंटर 'परख'ची स्थापना झाली. पीएमश्री शाळांतर्गत मॉडेल स्कूल विकसित केले जातील.

सुराज्य सोलापूर

सोमवार, दि. १० जुलै २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# शंकरराव मोहिते महाविद्यालयातील १४ मुलांची फिल्ड ऑफिसर पदावर निवड

✔ सुराज्य/अकलूज

अकलूजच्या शिक्षण प्रसारक मंडळाच्या शंकरराव मोहिते महाविद्यालय व स्वतंत्र मायक्रोफिन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या भव्य रोजगार मेळावा आज संपन्न झाला.या मेळाव्यात कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते व जागेवर १४ मुलांना फिल्ड ऑफिसर या पदावर नियुक्ती पत्र देण्यात आले.

शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील व संस्थेचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या रोजगार मेळाव्याचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ दत्तात्रय बागडे यांचे हस्ते व कंपनीचे एच.आर.साईरेडी आईनलावार, रिजनल मॅनेजर उमाकांत मोरे,देवेंद्र रौरळ,नितीन साहेब,महाविद्यालय प्लेसमेंट ऑफिसर डॉ.विश्वनाथ आवड यांचे प्रमुख उपस्थितीत झाले. संपुर्ण भारतात कार्यरत असलेल्या स्वतंत्र मायक्रोफिन या बिर्ला ग्रुप कंपनीच्या कॅम्पस मुलाखतीमध्ये आज अकलूज,इंदापूर,मंगळवेढा, टेंभुर्णी येथील जागासाठी एकुण ११६ जण सहभागी झाले होते. त्यापैकी ४८ जण मुलाखतीस पात्र ठरले व अंतिम १४ जणांची निवड करून त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आली.कागदपत्राची पुर्तता केल्यानंतर आणखी किमान ११ जणांची निवड होवू शकते असे कंपनीच्या वतीने सांगण्यात आले. कॅम्पस मुलाखतीचे यशस्वी आयोजन महाविद्यालयाचे प्लेसमेंट ऑफिसर डॉ. विश्वनाथ आवड, अधिक्षक युवराज मालुसरे, सुरज ननवरे, हितेश पुंज, नागनाथ साळवे, प्रकाश भोसले, समाधान शेंडगे, मनोज साठे, रोहित भुईटे, प्रतिक फुले, लोंढे मामा यांनी केले.

जनमत सर्वसामान्यांचे

सोमवार, १० जुलै २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात १४ मुलांचे, स्वतंत्र मायक्रोफिन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत फिल्ड ऑफिसर पदावर निवड

संग्रामनगर दि.०९ (प्रतिनिधी)- अकलूजच्या शिक्षण प्रसारक मंडळाच्या शंकरराव मोहिते महाविद्यालय व स्वतंत्र मायक्रोफिन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या भव्य रोजगार मेळावा आज संपन्न झाला.या मेळाव्यात कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते व जागेवर १४ मुलांना फिल्ड ऑफिसर या पदावर नियुक्ती पत्र देण्यात आले.

शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शन संचालक जयसिंह मोहिते पाटील मार्गदर्शनाखाली व संस्थेचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या रोजगार मेळाव्याचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ दत्तात्रय बागडे यांचे हस्ते व कंपनीचे एच.आर.साईरेडी आईनलावार, रिजनल मॅनेजर उमाकांत मोरे,देवेंद्र रौंरळ,नितीन साहेब,महाविद्यालय प्लेसमेंट ऑफिसर डॉ.विश्वनाथ आवड यांचे प्रमुख उपस्थितीत झाले.

संपुर्ण भारतात कार्यरत असलेल्या स्वतंत्र मायक्रोफिन या बिर्ला ग्रुप कंपनीच्या कॅम्पस मुलाखतीमध्ये आज अकलूज,इंदापूर,मंगळवेढा, टेंभुर्णी येथील जागासाठी एकुण ११६ जण सहभागी झाले होते. त्यापैकी ४८ जण मुलाखतीस पात्र ठरले व अंतिम १४ जणांची निवड करून त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आली.कागदपत्राची पुर्तता केल्यानंतर आणखी किमान ११ जणांची निवड होवू शकते असे कंपनीच्या वतीने सांगण्यात आले.

कॅम्पस मुलाखतीचे यशस्वी आयोजन महाविद्यालयाचे प्लेसमेंट ऑफिसर डॉ.विश्वनाथ आवड,अधिक्षक युवराज मालुसरे,सुरज ननवरे,हितेश पुंज, नागनाथ साळवे,प्रकाश भोसले,समाधान शेंडगे,मनोज साठे,रोहित भुईटे,प्रतिक फुले, लोंढे मामा यांनी केले.

पुण्य नगरी SMART
शुक्रवार, २८ जुलै २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जनजागृती रॅली

निमगाव / प्रतिनिधी

शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनी केले.

यावेळी डॉ. बाळासाहेब मुळीक, महाविद्यालयाचे प्रबंधक युवराज मालुसरे उपस्थित होते. रॅलीची सुरुवात महाविद्यालयातून प्रतापसिंह चौक - सदुभाऊ चौक या मार्गाने परत महाविद्यालय अशा पद्धतीने आयोजन करण्यात आलेले होते.




शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० जनजागृती रॅलीमध्ये सहभागी होताना प्र. प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे, डॉ. बाळासाहेब मुळीक, प्रबंधक युवराज मालुसरे, डॉ. दत्तात्रय मगर, डॉ. सज्जन पवार, प्रा. स्मिता पाटील व विद्यार्थी.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० चे महत्व विशद केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, जागतिक स्तरावर शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल होत आहेत. हे नवीन शैक्षणिक धोरण भावी पिढ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी गरजेचे आहे. त्यामुळे सर्वांनी या नवीन शैक्षणिक प्रवाहमध्ये सहभागी व्हावे. ही रॅली यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्तात्रय मगर, डॉ. सज्जन पवार, प्रा. स्मिता पाटील यांनी परिश्रम घेतले. या रॅलीमध्ये महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

जनमत सर्वसामान्यांचे

बुधवार, ०२ ऑगस्ट २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library



# शंकरराव मोहिते महाविद्यालयात सोलापूर विद्यापीठाचा १९ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

संग्रामनगर दि.०१ (प्रतिनिधी)- अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयामध्ये पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा १९ वा वर्धापन दिन,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने करून प्रतिमा पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे होते. यावेळी त्यांनी सोलापूर विद्यापीठाच्या स्थापनेपासून प्रगतीचा इतिहास विद्यार्थ्यांसमोर मांडला. त्याचबरोबर लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या कार्याचा आढावा घेतला.तसेच या कार्यक्रमप्रसंगी मराठी विभागाचे प्रा.डॉ.जनार्दन परकाळे यांनीही आपले विचार व्यक्त केले.

यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी -विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमत
सर्वसामान्यांचे
संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०
सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, लातूर
शुक्रवार ११ ऑगस्ट २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

# पौष्टिक तृणधान्य सेवन केल्यास मानवी आरोग्य उत्तम राहण्यास व जीवनशैली बदलण्यास मदत होईल : भाग्यश्री पवार

फलटण, दि.१० (प्रतिनिधी)-- कृषि विभागा मार्फत आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३ अंतर्गत १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२३ दरम्यान फलटण तालुक्यातील विद्यार्थ्यांमध्ये पौष्टिक तृणधान्य आणि त्याचे आहारातील महत्व यासंदर्भात जनजागृती चे विविध उपक्रम सुरू आहेत. कृषी विभागा मार्फत सासकल तालुका फलटण जिल्हा सातारा येथे आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य महोत्सव अंतर्गत जिल्हा परिषद शाळा, शिवशंकर माध्यमिक विद्यालय व ग्रामपंचायत सासकल यांच्या संयुक्त विद्यमानाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीला शाळेतील लेझीम पथक तसेच बैलगाडी द्वारे पौष्टिक तृणधान्य जनजागृती करिता गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सातारा मा भाग्यश्री पवार – फरांदे यांनी आहारात तृणधान्याचे सेवन केल्यास मानवी आरोग्य उत्तम राहण्यास व जीवनशैली बदलण्यास मदत होणार असल्याचे सांगितले. तसेच पौष्टिक तृणधान्य जनजागृती बाबत शाळेत घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, तसेच विद्यार्थ्यांनी तृणधान्य पासून बनवलेले पदार्थ, विविध तृणधान्य माहिती कार्ड कौतुकस्पद असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी सातारा भाग्यश्री पवार- फरांदे यांनी सांगितले तसेच सहभागी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. तृणधान्य पासून बाजरी चे लाडू, नाचणी पापड,अश्या विविध पाक कलाकृती तयार करून आणलेले पदार्थ कौतुकास्पद होते. पौष्टिक तृणधान्य चे आहारातील महत्व संदर्भात श्री कैलास धुमाळ उपविभागीय कृषि अधिकारी फलटण यांनी माहिती दिली तसेच राजगिरा, ज्वारी, बाजरी ,नाचणी इत्यादी नित्यनियमाने रोजच्या आहारात सेवन केल्याने आरोग्य निरोगी राहण्यास तसेच आयुष्यमान वाढण्यास नक्कीच मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ प्रसाद जोशी अस्थि रोग तज्ञ यांनी आपल्या मनोगतामध्ये व्यायामाचे महत्व पटवून दिले तसेच तृणधान्य सेवन केल्यास हाडे मजबूत होण्यास उपयोग होणार असल्याने रोजच्या आहारात तृणधान्य चा वापर करावा असे सांगितले. श्री सागर डांगे तालुका कृषि अधिकारी फलटण यांनी पौष्टिक तृणधान्य चे आहारातील महत्व विद्यार्थी तसेच शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी विविध उपक्रम व कार्यक्रम द्वारे जनजागृती करण्यात येत असल्याचे सांगितले.

यावेळी गट शिक्षण अधिकारी फलटण शाहीन पठाण यांनी कृषि विभागा मार्फत घेण्यात येत असलेले



उपक्रम स्तुत्य असून फलटण तालुक्यामधील सर्व शाळांमध्ये अशा प्रकारचे कार्यक्रम घेऊन विद्यार्थ्यांना पौष्टिक तृणधान्य बाबत माहिती दिली जाईल असे सांगितले. यावेळी विकास संसाधन व्यक्ती सुनीता सावंत यांनी प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उधोग योजना अंतर्गत तृणधान्य आधारित प्रक्रिया उधोग तसेच शेतीमालावर प्रक्रिया उधोग उभारणीसाठी ३५ टक्के अनुदान असल्याचे मोठ्या प्रमाणात सहभागी होणे बाबत सांगितले.

उपस्थित सर्व ग्रामस्थ आणि विद्यार्थी यांना राजगिरा लाडू चे वाटप करण्यात आले. मंडळ कृषि अधिकारी श्री अमोल सपकाळ यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले. या कार्यक्रमासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सातारा श्रीम.भाग्यश्री फरांदे, उपविभागीय कृषी अधिकारी फलटण श्री.कैलास धुमाळ, डॉक्टर प्रसाद जोशी अस्थिरोग तज्ञ, तालुका कृषी अधिकारी फलटण श्री. सागर डांगे, गटशिक्षणाधिकारी फलटण शाहीन पठाण, सरपंच सौ.उषाताई फुले, मंडळ कृषी अधिकारी विडणी श्री. अमोल सपकाळ, कृषि पर्यवेक्षक श्री. तानाजी काशीद , कृषी सहाय्यक श्री.सचिन जाधव तसेच जिल्हा परिषद शाळा व शिवशंकर माध्यमिक विद्यालय चे मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग, विद्यार्थी तसेच सासकल गावातील ग्रामस्थ–शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषि सहाय्यक आणि शिक्षक वृंद यांनी विशेष प्रयत्न केले.

# जनमत सर्वसामान्यांचे


संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०

सोलापूर, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, लातूर

शनिवार २६ ऑगस्ट २०२३



Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library



## शंकरराव मोहिते महाविद्यालयात विद्यार्थी शिक्षक-पालक मेळावा संपन्न

संग्रामनगर दि.२५ (प्रतिनिधी)– अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील बी.ए,बी.कॉम,बी.एस्सी,एम.ए, एम.एस्सी या शाखेतील विद्यार्थी– शिक्षक– पालक मेळावा प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.

या कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात विद्यार्थी–शिक्षक– पालक संघाचे प्रमुख डॉ.चंद्रशेखर ताटे यांनी विद्यार्थी–शिक्षक– पालक संघ स्थापन करण्याचा उद्देश सांगून महाविद्यालयात राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाविषयी माहिती दिली.तसेच सर्व गुणसंपन्न विद्यार्थी तयार होण्यासाठी विद्यार्थी,शिक्षक व पालक यांची जबाबदारी याविषयी माहिती देऊन उपस्थित विद्यार्थी शिक्षक पालकांचे स्वागत केले. त्यानंतर माळशिरस तालुक्याचे भाग्यविधाते सहकार महर्षी शंकरराव मोहिते–पाटील व श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते–पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित पालकांच्या शुभहस्ते करण्यात आले.यावेळी नवी दिल्ली येथे कन्यादान फौंडेशनच्या वतीने दिला जाणारा नॅशनल युथ ब्रिलियन्स अवार्ड महाविद्यालयाचा विद्यार्थी सत्यजित चव्हाण याला मिळाल्याबद्दल त्याचे वडील बाळू किसन चव्हाण व आई सौ. संगीता बाळू चव्हाण यांच्या समवेत पुरस्कार प्राप्त विद्यार्थी सत्यजित चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी विद्यार्थी व पालक यांनी आपली मनोगते व्यक्त केली.यामध्ये सत्यजित चव्हाण यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थी जीवनाच्या सुरुवाती पासून आज पुरस्कार मिळेपर्यंतचा प्रवास आपल्या ओघवत्या शब्दात व्यक्त केला. तसेच पालक प्रतिनिधी व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी नारायण निकम यांनी पालकांच्या जबाबदारी बद्दल मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या प्रत्येक उपक्रमात प्रामाणिकपणे सहभागी होऊन आपला व्यक्तिमत्व विकास साध्य करावा असे आवाहन केले. अध्यक्षीयं मनोगतात एन.सी.सी प्रमुख प्रा.नंदकुमार गायकवाड यांनी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना,क्रीडा व सांस्कृतिक विभागाची माहिती देऊन विद्यार्थी,शिक्षक व पालक यांच्या जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.साक्षी पिसे व शुभांगी बडे यांनी तर आभार प्रदर्शन शिक्षक-विद्यार्थी–पालक संघाचे सचिव डॉ. अण्णासाहेब नलवडे यांनी केले. या कार्यक्रमानंतर उपस्थित पालकांना महाविद्यालयातील ग्रंथालय, जिमखाना व विविध विभागांना भेटी देऊन पालकांना माहिती देण्यात आली.ग्रंथालय विभागाच्या वतीने महाविद्यालयाचा वार्षिक विशेषांक पालकांना भेट देण्यात आला. या कार्यक्रमासाठी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.एच.के. आवताडे,सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.विश्वनाथ आवड,जिमखाना विभाग प्रमुख प्रा.अरविंद वाघमोडे,एन.एस.एस विभाग प्रमुख प्रा.दत्तात्रय मगर, ग्रंथपाल डी. एस.पाटील, कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे तसेच राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना विभागातील विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

जनमत सर्वसामान्यांचे
गुरूवार, २८ सप्टेंबर २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj - 413101

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात आरोग्य शिबिर संपन्न




संग्रामनगर दि.२७ (प्रतिनिधी)– अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कार्य प्रसिद्धी सप्ताहा अंतर्गत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.हनुमंत अवताडे हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ.अवताडे म्हणाले की;विद्यार्थ्यांनी आपल्या आरोग्याच्या बाबतीत सजग असणे अत्यंत महत्त्वाचे आहे,या प्रकारच्या आरोग्य तपासणी शिबिरांमधून विद्यार्थ्यांच्या रक्तातील घटक तपासले जातात व त्यावरून विद्यार्थ्यांच्या आरोग्य विषयक समस्यांची सोडवणूक करणे शक्य होते.

अकलूज उपजिल्हा रुग्णालयातील तांत्रिक सहाय्यक सुंदर गायकवाड तसेच त्यांचे सहकारी अजय जाधव व निकीता पवार यांनी या शिबिरात आरोग्य तपासणीचे काम केले.सुंदर गायकवाड आपल्या मनोगतात म्हणाले की,अलीकडच्या काळात विविध आजारांवर अत्याधुनिक उपचार उपलब्ध आहेत तथापि आरोग्य तपासण्यांच्या माध्यमातून युवक युवतींच्या आजारांचे निदान करणे शक्य होते.या शिबिरात ९० विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.सज्जन पवार यांनी केले.अजय नाईकनवरे याने सूत्रसंचालन केले ,तर आभार अल्केश गेजगे याने मानले.हे शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.दत्तात्रय मगर,डॉ.सज्जन पवार,प्रा. स्मिता पाटील कार्यालयीनअधीक्षक युवराज मालुसरे यांच्यासह सर्व स्वयंसेवक व स्वयंसेविका यांनी परिश्रम घेतले.

पुढारी
MY सोलापूर
मंगळवार, ३ ऑक्टोबर २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj - 413101



अकलूज : शंकरराव मोहिते महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले.

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात वृक्षारोपण

**अकलूज : पुढारी वृत्तसेवा**

येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या 'कार्यप्रसिद्धी सप्ताह' अंतर्गत वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी वृक्ष संवर्धनासाठी जनजागृती करणाऱ्या घोषणा दिल्या. टाळ-मृदुंगाच्या निनादात महाविद्यालय परिसरातून ही वृक्षदिंडी काढण्यात आली.

खाशाबा जाधव इनडोअर स्टेडियमजवळ या दिंडीचा समारोप झाला. यानंतर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी या वृक्षदिंडीमध्ये स्वयंसेवकांबरोबर महाविद्यालयातील प्रा. डॉ. विश्वनाथ आवड, डॉ. बाळासाहेब मुळीक, डॉ. जनार्दन परकाळे सहभागी झाले होते. या कार्यक्रमात १५० स्वयंसेवकांनी सहभाग घेऊन रोपांची लागवड केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्तात्रय मगर, डॉ. सज्जन पवार, प्रा. स्मिता पाटील, युवराज मालुसरे यांनी परिश्रम घेतले.

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
* Akluj - 413101 *

लोकमत
epaper.lokmat.com
सोलापूर, मंगळवार, दि. ३ ऑक्टोबर २०२३



अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी वृक्ष संवर्धन जनजागृती केली.

# अकलूज येथे वृक्षसंवर्धन जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

अकलूज : झाडे लावा, झाडे जगवा.. पर्यावरण समतोलासाठी वृक्षसंवर्धन करा.. या घोषणा देत शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धनासाठी जनजागृती केली.

माळेवाडी-अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत कार्यप्रसिद्धी सप्ताहांतर्गत वृक्षदिंडी व वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी वृक्ष संवर्धनासाठी जनजागृती करणाऱ्या घोषणा दिल्या. टाळ-मृदंगाच्या निनादात महाविद्यालय परिसरातून वृक्षदिंडी काढण्यात आली. खाशाबा जाधव स्टेडियमजवळ या दिंडीचा समारोप केला. यावेळी वृक्षदिंडी स्वयंसेवकाबरोबर महाविद्यालयातील प्रा. डॉ. विश्वनाथ आवड, डॉ. बाळासाहेब मुळीक व डॉ. जनार्दन परकाळे सहभागी झाले होते. यामध्ये १५० स्वयंसेवकांनी १०० रोपांची लागवड केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्तात्रय मगर, डॉ. सज्जन पवार, प्रा. स्मिता पाटील व कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे यांनी परिश्रम घेतले.

जनमत सर्वसामान्यांचे

मंगळवार, ०३ ऑक्टोबर २०२३

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj - 413101 *

# गांधीजींची अहिंसा समजुन घ्यावी लागेल : डॉ.विश्वनाथ आवड

संग्रामनगर दि.०२ (प्रतिनिधी)– अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कार्यप्रसिद्धी सप्ताह समारोप प्रसंगी आज महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन तसेच महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली.यावेळी राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विश्वनाथ आवड यानी 'महात्मा गांधीजी समजून घेताना' या विषयावरती विचार मांडले. ते पुढे म्हणाले की,जागतीक पातळीवरील नेत्यांनी महात्मा गांधी सर्वांना माहित आहेत पण ते समजून घेतले पाहिजेत.१९२३ चा भारत २०२३ भारत या शंभर वर्षाच्या भारताचे अंतर ध्यानात घ्यावे लागेल.१९२३ ला राष्ट्र होते पण भारत देश स्वतंत्र झालेला नव्हता.त्यावेळेस नव्वद टक्के लोक निरक्षर,कुपोषीत,गरीबीच्या खाली जीवन जगणारे होते. त्यांना सोबत उभे करण्याचे काम १९१४ ते १९४७ या काळात



गांधीजीने केले.त्यासाठी लोकांना नेता आपला वाटला पाहिजे या हेतून कार्यक्रम दिला.असहकाराचा, सत्याग्रहाचा,अहिंसेचा,सत्याग्रह हा शब्दाची ताकद गांधीजींनी ओळखली म्हणूनच अनेक नेते गांधीजींनी सामान्य कार्यकर्ते बनविले.चिरंतन शाश्वत विकासाचे मॉडेल गांधीनी मांडले, मारेंगे नही लेकिन मारेंगे भी नही या मुलमंत्राने जनतेला राष्ट्रीय जनआंदोलनात सहभागी होण्यास भाग पाडले.अहिंसा केवळ हिंसा टाळून साध्य होणार नाही तर विचाराने व कृतीने होणारी हिंसा सुध्दा गांधीजींना मान्य नव्हती.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे होते. याप्रसंगी ज्युनिअर विभागाचे पर्यवेक्षक प्रा.राजकुमार इंगोले, डॉ.शिरीष शिंदे,डॉ.जनार्दन परकाळे,डॉ.चंकेश्वर लोंढे व स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक प्रा.अजित चंदनकर उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.दत्तात्रय मगर,डॉ.सज्जन पवार,प्रा.स्मिता पाटील व कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे यांनी परिश्रम घेतले.

# जनमत

## सर्वसामान्यांचे

संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०
सोलापूर, धाराशिव, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, लातूर

@gmail.com बुधवार ११ ऑक्टोबर २०२३ वर्ष १४ अंक


# शंकरराव मोहिते महाविद्यालयात वन्यजीव संवर्धन सप्ताह साजरा

संग्रामनगर दि.१० (प्रतिनिधी)– अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयात वन्यजीव संवर्धन सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पक्षीमित्र डॉ.अरविंद कुंभार होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे होते.

या कार्यक्रमाची सुरुवात सहकार महर्षी शंकरराव मोहिते व आक्कासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.कार्यकमाच्या प्रस्ताविकामध्ये प्राणीशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ.सुधा बनसोडे यांनी प्राणीशास्त्र विषयाचे महत्त्व,फायदे आणि गरज व त्याच बरोबरच निसर्ग चक्र चालू रहण्यासाठी वन्यजीव अतिशय महत्त्वाचे आहेत. सध्याच्या वस्तुस्थितीचा विचार केला तर पक्षी व प्राणी बेघर झाले आहेत. त्यांचे संगोपन करणे काळाची गरज आहे.

प्रमुख पाहुणे डॉ.अरविंद कुंभार यांनी विद्यार्थ्यांना पक्षांचे व्हिडिओच्या माध्यमातून जीवन चक्र दाखविले.निसर्गात पक्ष्यांचे मानवी जीवनात किती महत्त्व आहे हे सांगितले.अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे यांनी नवीन शिक्षण पध्दती म्हणजे कौशल्यावर आधारित शिक्षणाची सध्या आवश्यकता आहे.



या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अश्विनी हेगडे यांनी केले तर आभार प्रदर्शन कु.मधुरा देशमुख यांनी मानले.तर प्रमुख पाहुण्यांची ओळख की.पुजा सावंत यांनी करुन दिली.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अर्चना पवार, गणपत लोंढे याचे सहकार्य लाभले.या कार्यक्रमासाठी विज्ञान शाखेचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library

दैनिक दिव्य मराठी
# सोलापूर जिल्हा
सोलापूर ▪ उत्तर सोलापूर ▪ मोहोळ ▪ मंगळवेढा ▪ बार्शी ▪ माळशिरस ▪ माढा ▪ करमाळा ▪ सांगोला ▪ अक्कलकोट ▪ पंढरपूर
सोलापूर | शनिवार, १३ जानेवारी २०२४

अकलूजमध्ये दंत तपासणी शिबिर

## मोहिते महाविद्यालयात दंत चिकित्सा शिबिरात १२० जणांची तपासणी



अकलूज | येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात आरोग्य समिती व वनस्पतीशास्त्र विभागाच्या विद्यमाने घेतलेल्या दंत चिकित्सा शिबिरात १२० जणांची तपासणी करण्यात आली. डॉ. नीतल फडे यांनी दातदुखींची कारणे याबरोबरच दातांची वेळीच तपासणी केली नाही तर वेदना व खर्च दोन्ही वाढतो, प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनीही मार्गदर्शन केले. रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सतीश देवकर उपस्थित होते. डॉ. सविता सातपुते यांनी प्रास्ताविक केले. प्रा. विक्रम कुंभार यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. प्राची जगताप यांनी केले. जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शिबिर आयोजन केले होते.

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Library

सुराज्य सोलापूर
शनिवार, दि. १३ जानेवारी २०२४

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj - 413101 * Library



अकलूजः शंकरराव मोहिते कॉलेजात दंत चिकित्सा करताना डॉक्टर, कर्मचारी वृंद.

# शंकरराव मोहिते कॉलेजात १२० जणांची दंत तपासणी

**अकलूज** : शंकरराव मोहिते महाविद्यालयामध्ये आयोजित दंत तपासणी शिबिरात १२० जणांची दंत चिकित्सा करण्यात आली. आरोग्य समिती, वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या विद्यमाने शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दंत आरोग्य शिबिराचे आयोजिले होते.यासाठी डॉ. नीतल फडे, मनाली गांधी यांचे सहकार्य लाभले. प्रास्ताविक वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख, आरोग्य समिती प्रमुख डॉ.सविता सातपुते, आभार प्रदर्शन प्रा.विक्रम कुंभार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.प्राची जगताप यांनी केले. यासाठी प्रा.सी.डी.चव्हाण, पी.एच.नलवडे, पी.एम. धाईंजे, डी.एफ.माने-देशमुख, बामणे, मालुसरे, शिक्षकेतर कर्मचारी बी.बी.कदम यांचे सहकार्य लाभले.

संचार
सोलापूर, शुक्रवार, २६ जानेवारी २०२४

# आलेगाव येथील प्रा.डॉ.फुलारी यांची कुलगुरुपदी निवड

**सांगोला, दि.२५ -** तालुक्यातील आलेगाव येथील प्रा.डॉ. विजय जनार्दन फुलारी यांची छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरूपदी नियुक्ती राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी केली आहे.



डॉ.फुलारी यांचे प्राथमिक शिक्षण आलेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले माध्यमिक शिक्षण मेडशिंगी विद्यालयात तर उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर येथे झाले. ते भौतिकशास्त्राचे पदवीधर होते १९८७ मध्ये एम.एससी पदव्युत्तर शिक्षण शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे पूर्ण केले. त्यानंतर १९९९ ला पीएच.डी. पदवी मिळवली. एम.एस्सी झाल्यानंतर १९८७ ते २००८ पर्यंत ते अकलूज येथील शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून सेवेत होते.

२००८ ते आजअखेर शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागात ते प्राध्यापकपदी कार्यरत असून मटेरियल सायन्समधील संशोधनात त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांना शिक्षण क्षेत्रातील ३६ तर संशोधनातील कामाचा ३२ वर्षाचा अनुभव आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत २४ विद्यार्थ्यांनी पीएचडीचे संशोधन तर ४ हजार विद्यार्थ्यांनी एम.एससी अभ्यासक्रमातील संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. इंडो कोरियन संयुक्त संशोधन प्रकल्पातसुद्धा त्यांनी योगदान दिले आहे.